# संपादकीय

## उजाडले, सूर्य कुठे?

इराणबरोबरच्या संघर्षात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बेमुदत युद्धविरामाची घोषणा केली. चर्चा आणि वाटाघाटीतून या संघर्षात मार्ग निघेपर्यंत, अंतिम तोडगा होईपर्यंत हा युद्धविराम असेल. अमेरिकेने हल्ले थांबवले आणि शस्त्रे म्यान केली, हा एक भाग झाला. तथापि, ट्रम्प यांनी यात एक मेख मारली आहे. ती म्हणजे, होर्मुझ सामुद्रधुनीतील नौदल नाकेबंदी चालूच ठेवण्याची. म्हणजे युद्धविरामाची घोषणा करताना ट्रम्प यांनी दुटप्पी भूमिका कायम ठेवली. ती त्यांच्या आजवरच्या स्वभावाला धरूनच आहे. नाकेबंदीमुळे इराणवर टांगती तलवार कायम आहे. नेमका त्यालाच इराणणे आक्षेप घेत वाटाघाटीत सक्रिय सहभाग घ्यायला असमर्थता दर्शवली. म्हणजे पुन्हा आहे तिथेच आहे. त्यामुळे उजाडले, तथापि, सूर्य कुठे आहे, प्रत्यक्षात युद्धबंदी कुठे झाली आहे, युद्ध थांबले कुठे आहे, अशीच विद्यमान परिस्थिती आहे. ट्रम्प यांची आडमुठी भूमिकाच त्याला कारणीभूत आहे.

इराणने युरेनियम संवर्धन बंद करावे, युरेनियमचा साठा हस्तांतरित करावा, अण्वस्त्र सुविधा संपुष्टात आणाव्यात, ही इराणवरील हल्ल्यामागची अमेरिकेची भूमिका आणि त्यासाठी इस्रायलने त्यांना चिथावणी दिली. व्हेनेझुएलाप्रमाणे इराण सहज कब्जात घेऊ अशा घमेंडीत ट्रम्प यांनी इराणवरील हल्ल्याचे अतिरेकी आणि आततायी पाऊल उचलले; पण दोन महिने होत आले, तरी इराण नमलेला नाही. इराणचे सर्वोच्च नेते खोमेनी यांची अमेरिकेने हत्या घडवून आणली. त्यानंतरही अनेक प्रमुख नेते, अधिकाऱ्यांच्या हत्या करण्यात आल्या. त्यातून इराणमध्ये अशांतता घडेल आणि आपला हेतू साध्य होईल, ही ट्रम्प यांची अपेक्षा होती. इराणमधील घडामोडींवर लक्ष ठेवून असलेले युवराज पहलवी गुडघ्याला बाशिंग बांधून तयारच होते. तथापि, त्यांचा होरा चुकला आणि इराणमध्ये सत्तांतर झाले नाही. उलट राष्ट्रप्रमुखांच्या आणि प्रमुख नेत्यांच्या हत्येने इराणमध्ये अमेरिकेविरोधात संतापाची लाट उसळली. प्रत्युत्तर द्यायचा इराणने निर्धार केला आणि संघर्षाला तोंड फुटल्यापासून त्यात कसूर ठेवलेली नाही.

जगातील सर्वात मोठे लष्कर, नौदल, हवाई दल आणि प्रचंड शस्त्रसामग्री असणाऱ्या अमेरिकेला इराणचे हे प्रत्युत्तर चांगलेच महागात पडलेले आहे. ट्रम्प यांनी अनेक गर्जना केल्या; पण दरवेळी एकदा आक्रमक घोषणा करायची आणि लगेचच नरमाईचे धोरण जाहीर करायचे, अशा धरसोड वृत्तीशिवाय त्यांच्याकडून काहीही साध्य झालेले नाही. अमेरिकेच्या जाळ्यात इराण न सापडता अमेरिकाच या चक्रव्यूहात गुंतल्याचे चित्र दिसत आहे. अमेरिकेला शह देण्यासाठी इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आणि त्याचा परिणाम कच्च्या तेलाच्या दरावर आणि अपरिहार्यपणे जागतिक अर्थव्यवस्थेवर झाला. इराणी राज्यकर्त्यांनी या सामुद्रधुनीचा शस्त्र म्हणून अचूक वापर केला. अमेरिकेने इराणला शह द्यायचा म्हणून सामुद्रधुनीत नौदल नाकेबंदी केली. त्यामुळे परिस्थिती चिघळली, तरी त्यातून अमेरिकेला अपेक्षित परिणाम साधता आलेला नाही.

उलट पाकिस्तानच्या खांद्यावर बंदूक ठेवून अमेरिकेला वाटाघाटीचा घाट घालावा लागला आहे. त्यात डोनाल्ड ट्रम्प यांचा स्वभाव अहंकारी. निर्णयात धरसोड वृत्ती. इराण प्रकरणात युरोपियन राष्ट्रांनीही त्यांना साथ दिली नाही. ट्रम्प यांची भाषा उद्दाम. ती कोणी सहन करणार नाही. आपण हुकूम केला की, युरोपियन देश आपल्या मागे येतात, हा ट्रम्प यांचा विश्वास. तथापि, ट्रम्प यांनी आततायीपणा करावा आणि त्याला आपण ‘मम’ म्हणावे, अशी युरोपियन राष्ट्रांची मानसिकता आता राहिलेली नाही. हे शेखचिल्लीप्रमाणे स्वप्ने पाहणाऱ्या ट्रम्प यांच्या ध्यानी आले नाही. त्यामुळे त्यांना मनगट चावीत बसण्यापलीकडे काही करता आले. त्यांनी डोळे वटारूनही काही फायदा झाला नाही. युरोपियन देशांनी ट्रम्प यांना वाऱ्यावर सोडले. स्पेनसारख्या छोट्या राष्ट्रानेही ट्रम्प यांना मूँहतोड जवाब दिला. यातून ट्रम्प यांच्याविषयी जगामध्ये काय भावना आहेत, हेच स्पष्ट झाले.

या सार्या धामधुमीत रशिया आणि चीन या बलाढ्य देशांची इराणला सहानुभूती असल्याचे स्पष्ट झाले असले, तरी अमेरिकेच्या कारवायांना उत्तर द्यावे, अशी त्यांची तयारी दिसत नाही. या प्रयत्नात अमेरिकेचे हसे होत आहे आणि त्यांचा युद्ध खर्च वाढत आहे. त्यामुळे चीन, रशिया यांना आनंदाच्या उकाळ्या फुटत असतील, तर त्यात आश्चर्य नाही. इराणमध्ये चीनचे हितसंबंध आहेत आणि परिस्थितीने गंभीर वळण घेतले, तर चीन शांत बसेल असे नाही. चीनने हस्तक्षेप केला, तर या संघर्षाला नवा आयाम प्राप्त होईल. तसेच मध्यपूर्वेवर सध्या जे अमेरिकेचे अनिर्बंध वर्चस्व आहे, त्यालाही धक्का बसेल. रशियाचे अरब राष्ट्रात हितसंबंध आहेत. नव्या गंभीर घटना घडल्या, तर रशियाही स्वार्थ साधण्यासाठी हालचाली करू शकतो. तसे झाले, तर या भागातील प्रादेशिक तोल बिघडून जाईल आणि त्याचा दीर्घकाळ परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकेने या भावी घटनांची किती दखल घेतली आहे, याची कल्पना नाही; पण ट्रम्प यांच्या नेतृत्वाने एकूणच अमेरिकेला अडचणीत आणले आहे. त्यांचा हा चौखूर वारु कोणी रोखेल असे दिसत नाही. त्याची फळे अमेरिकेला भोगावी लागतीलच; पण सुदैवाने सार्या जगालाच त्याचे कमी-अधिक परिणाम भोगावे लागतील. या संघर्षाने जगभर महागाईचा वणवा उद्भवला आहे. शेअर बाजारावर जबरदस्त परिणाम झाला आहे. या संघर्षाची झळ सर्वसामान्य कुटुंबापर्यंत पोहोचली आहे. छोट्या व्यावसायिकांना चटके सोसावे लागत आहेत. या सार्याला ट्रम्प यांचे आक्रस्ताळे, आगाऊ नेतृत्वच जबाबदार आहे. इतिहासात अनेक लहरी, क्रूरकर्मा राज्यकर्ते होऊन गेले; पण ट्रम्प यांनी आपल्या बेमुर्वत, हट्टाग्रहापोटी सार्या जगालाच वेठीस धरले. आताही बेमुदत युद्धविरामाची घोषणा करताना सामुद्रधुनीतील नौदल नाकेबंदी चालूच ठेवण्याचा ट्रम्प यांच्या दुटप्पी भूमिकेने तोडगा दृष्टिपथात येणारच नाही. ट्रम्प आणि अमेरिकेला ते कळत नसेल, असे नाही; पण आपले ते खरे करण्याच्या नादात ट्रम्प यांनी लक्ष्मणरेषा ओलांडली आहे, हेच भावी इतिहासात नोंदले जाईल.




# दलितासाठीच नव्हे तर समाजातील इतर घटकासाठी अधिकार प्रदान करून देणारे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर :- एक चिंतन



मी भीमराव रामजी आंबेडकर माझा जीवन प्रवास अत्यंत प्रेरणादायी आणि परिवर्तनकारी आहे माझा जन्म 14 एप्रिल1891 रोजी महाराष्ट्रातील रामबाग महू येथे झाला एक गरीब कुटुंबात जन्म झाले माझ्या वडिलांचे नाव रामजी मालोजी सपकाळ ते ब्रिटिश सैन्यात नोकरीस होते ते फारसे शिकलेले नव्हते परंतु त्यांना तुटकी फुटकी इंग्रजी येत असत पण त्यांना माहित होते की शिक्षण हेच शस्त्र आहे हे त्यांना पक्के माहीत होते त्यामुळे त्यांनी मला उच्चशिक्षित बनवायचे ठरवले त्यासाठी त्यांनी माझा रोज अभ्यास घेत असत मी केव्हा दमलो झोपतो तरी मला उठून बसवत आणि म्हणत भीमा आपल्याला शेत नाही, दुकान नाही शिक्षण हेच तुझे शेत आहे नांगरल्याशिवाय पीक येणार नाही त्यामुळे माझ्या वडिलांनी शिक्षणासोबत कसे वागायचे व अंधश्रद्धा बद्दल मला त्यांनी सांगितलं होतं ही भीमा जे बुद्धीला पटेल तेच तू मान ही शिकवण दिली माझ्या वडिलांच्या त्यागामुळे व त्यांनी मला पुस्तक हातात दिले तेव्हाच माझे आयुष्य बदलले कारण की मला लहान पण पासूनच अस्पृश्यतेचे खूप अपमान सहन करावा लागला ही अनुभव लोक हिताच्या प्रेरणेचे मूळ कारण होते माझ्या बालपणीच्या काही आठवणी त्यांना उजाळा देतो जेव्हा शिक्षक वर्गात बसू देत नसत मला खिडकी बाहेर बसावं लागत फळाला स्पर्श करु देत नसेल अस्पृश्यतेचा काळिंबा इतका जड होता की एक प्रसंग असा माझ्यासोबत घडला तू सांगतो मी माझ्या वडिलांना भेटायला जाताना गाडीवाल्याने महार असल्याचे कळताच मला उतरवले मी उपाशी तहानलेला तेव्हा मी फक्त 9वर्षाचा होतो त्यात क्षणी मनात निर्धार केला की हा अस्पृश्यतेचा अन्याय संपवल्याशिवाय राहायचे नाही पुढे एकदा असाच वेदनादायी प्रसंग घडला मी अस्पृश्य असल्याने न्यावीने माझे केस कापण्यास नकार दिला तेव्हा माझ्या बहिणीकडून मला केस कापावे लागले त्यामुळे मी पक्का निर्धार केला की हा प्रश्न माझा वैयक्तिक नसून संपूर्ण समाजाचा आहे मग मी विचार केला की आपल्या लोकांसाठी काहीतरी केलं पाहिजे ही जाणीव झाली त्यासाठी आपल्याला शिक्षण घ्यावे लागेल तरच आपल्याला अस्पृश्यतेच्या विळख्यात अडकलेल्या समाजाला बाहेर काढता येईल त्यामुळे मी शिक्षणाकडे वळलो माझे प्राथमिक शिक्षण सातारा येथे झाले व मॅट्रिक पर्यंत काळ अत्यंत गरिबीचा होता माझ्या वडिलांनी भरपूर हाल सोचले पण शाळा सोडून दिले नाही पुढील शिक्षण मुंबई विद्यापीठातून बीए ही पदवी प्राप्त केली व तसेच परदेशातील कोलंबिया विद्यापीठातून एम ए ही पदवी प्राप्त करायची होती त्यासाठी माझे वडील सयाजीराव गायकवाड यांना भेटून मला25 रुपये शिष्यवृत्ती मंजूर करून पाठवले त्यानंतर पुढील शिक्षणासाठी वडिलांची इच्छा होती की आपला मुलगा अजून पुढे शिकावा मोट व्हावं त्यासाठी अजून पैशाची गरज पडली मग त्यावेळेस कोल्हापूरचे राजे राजश्री शाहू महाराजांनी मला लंडनला पीएचडी साठी पैशाची मदत केली आणि त्यामुळे आज मी जे घडलो ते फक्त राजश्री शाहू महाराज मुळे घडलो माझे आदर्श म्हणून मी राजश्री शाहू व ज्योतिबा फुले मानतो ज्योतिबा फुलेंचा वैचारिक वारस म्हणत ज्योतिबा फुलेंनी पाया रचला मी त्यावर इमारत बांधली आम्हा दोघांचे ध्येय एकच होते मानव मुक्ती म्हणून मी यांना मानतो एक गोष्ट मी ज्योतिबा बद्दल सांगतो त्यांनी झोपलेल्या समाजाला जागे केले आणि त्या दलित समाजाला हक्क मिळवून दिला मी त्यांच्या प्रेरणेतून असे शिकलो की दलितांना जर गुलामगिरीतून बाहेर निघायचे असेल तर आपल्याला एक प्रतिज्ञा घ्यावी लागेल काही प्रेरणा आपल्याला अमलात आणावे लागेल ती म्हणजे (1) अनुभव

(2) शिक्षण

(3) नैतिकता

(1) अनुभव--- स्वतः अन्याय भोगला म्हणून दुसऱ्याचा अन्याय कळाला.

(2) शिक्षण--- जगातले ज्ञान मिळाले म्हणून अन्याय दूर करण्याचे मार्ग कळाले.

(3) नैतिकता--- बुद्ध, कबीर, ज्योतिबा फुले यांच्या विचारातून माणुसकी हाच धर्म मानला

ह्या विचारातून समाज सुधारेल मला अपेक्षा आहे माझी शेवटची इच्छा आपण जोपासाल मी माझे काम केले.

“तुम्ही शिकाल तर टिकाल”

“ तुम्ही लढाल तर टीकाल “

तुम्ही स्वाभिमानाने जगाल तरच माझा जन्माचे सार्थक होईल.

* शिका संघटित व्हा संघर्ष करा*



**शब्दांकन**
**श्री. दुर्गे दीपक रूपचंद**
**( संगणक विभाग)**
**महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर जिल्हा लातूर.**

# ‘अँकर बेबीज’ ते ‘नरकसदृश देश’ : ट्रम्प यांच्या भाषेभोवतीचा वाद

**डॉ. भारत कऱ्हाड**



जागतिक राजकारणात शब्द ही केवळ संवादाची साधने नसतात; ते लोकांच्या धारणा घडवतात, विविध कथांना आकार देतात आणि कालांतराने समाजांवर प्रभाव टाकतात. ‘अँकर बेबीज’ आणि ‘नरकसदृश किंवा घाणेरडे देश’ या संज्ञा या वास्तवाची ठळक उदाहरणे आहेत. या अभिव्यक्तींना विशेषतः डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाली आणि त्यामुळे जगभरात तीव्र राजकीय व नैतिक वादविवाद उभे राहिले. म्हणूनच, या संज्ञांचा अर्थ, त्यांचा संदर्भ आणि त्यांचे परिणाम समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

‘अँकर बेबीज’ ही संज्ञा अमेरिकेतील ‘जन्मसिद्ध नागरिकत्वाच्या’ तत्त्वाशी जवळून जोडलेली आहे. अमेरिकेच्या संविधानातील 14 व्या घटनादुरुतीनुसार अमेरिकेच्या भूमीवर जन्मलेले कोणतेही मूल आपोआप अमेरिकेचे नागरिक बनते. या तरतुदीमुळे अशी धारणा निर्माण झाली आहे की, काही स्थलांतरित कुटुंबे केवळ आपल्या मुलाला नागरिकत्व मिळावे या उद्देशाने अमेरिकेत येतात आणि तिथे मुलाला जन्म देतात, जेणेकरून भविष्यात त्या मुलाच्या नागरिकत्वाच्या आधारे संपूर्ण कुटुंबाला तिथे स्थायिक होण्यास मदत होईल. म्हणूनच, अशा मुलांना ‘अँकर बेबीज’ असे संबोधले जाते; याचा गर्भित अर्थ असा की, ही मुले कुटुंबासाठी एका ‘आधारस्तंभा’चे काम करतात. मात्र, वास्तव त्यापेक्षा कितीतरी अधिक गुंतागुंतीचे आहे. जरी मूल जन्मतःच नागरिक बनत असले, तरी त्याच्या पालकांना आपोआप नागरिकत्व किंवा कायदेशीर दर्जा मिळत नाही; त्यासाठी त्यांना दीर्घ आणि अनेकदा कठीण कायदेशीर प्रक्रियेतून जावे लागते. त्यामुळे ‘अँकर बेबीज’ ही संज्ञा अनेकदा दिशाभूल करणारी आणि राजकीय हेतूने प्रेरित मानली जाते, कारण ती एका गुंतागुंतीच्या कायदेशीर आणि मानवी मुद्द्याचे अतिसरलीकरण करते.

दुसरीकडे, ‘नरकसदृश’ किंवा ‘घाणेरडे’ देश ही संज्ञा अधिकच आक्रमक आणि वादग्रस्त आहे. 2018 मध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी काही आफ्रिकन देश आणि हैती यांच्या संदर्भात अशा प्रकारचा उल्लेख केल्याचे वृत्त समोर आले आणि त्यावरून जगभरातून तीव्र संताप व्यक्त झाला. टीकाकारांनी या विधानाला असंवेदनशील आणि वर्णद्वेषी म्हटले, तर काही समर्थकांनी असा युक्तिवाद केला की, या विधानातून त्या देशांमधील कठोर वास्तव अधोरेखित होते. तथापि, या वादातून एक महत्त्वाचा प्रश्न समोर येतो—एखाद्या देशातील समस्यांविषयी चर्चा करताना आपण कोणत्या भाषेचा वापर करतो? जगाच्या काही भागांमध्ये गरिबी, अस्थिरता आणि राहणीमानाची दयनीय अवस्था अस्तित्वात आहे, हे नाकारता येत नाही; परंतु संपूर्ण देशांनाच अशा अपमानकारक शब्दांनी संबोधणे म्हणजे त्या देशातील लोकांच्या प्रतिष्ठेला धक्का देणे आणि त्यांच्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष करणे होय.

हे सर्व आपल्याला एका व्यापक आणि अधिक तात्त्विक चिंतनाकडे घेऊन जाते—आपण कुठून आलो आहोत आणि कुठे चाललो आहोत? एकेकाळी आपल्या संस्कृती, परंपरा आणि कुटुंबव्यवस्थांमध्ये घट्ट रुजलेला समाज आज संधींच्या शोधात जगभर पसरत आहे. ‘अँकर बेबीज’सारख्या संकल्पना या बदलत्या मानसिकतेचे प्रतीक आहेत, जिथे पालक जागतिक स्थलांतराच्या माध्यमातून आपल्या मुलांसाठी अधिक सुरक्षित भविष्याचा शोध घेतात. परंतु या प्रवासात एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो—आपण केवळ संधींच्या मागे धावत आहोत की आपल्या मूल्यांचीही जपणूक करतो आहोत? परदेशातील संधी निश्चितच आकर्षक आहेत; मात्र त्यासोबत येणाऱ्या कायदेशीर जबाबदाऱ्या, भावनिक आव्हाने आणि सांस्कृतिक गुंतागुंत यांचाही विचार करणे तितकेच आवश्यक आहे.

भारताच्या संदर्भातही अशाच प्रकारचे काही गैरसमज निर्माण झाले आहेत. काही व्हायरल दाव्यांमध्ये असे सुचवण्यात आले होते की डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचा उल्लेख ‘नरकसदृश’ असा केला होता. तथापि, अशा थेट विधानाचा कोणताही विश्वसनीय पुरावा उपलब्ध नाही. त्यांनी भारतातील प्रदूषण आणि पर्यावरणीय समस्यांवर टीका केली असली, तरी त्यांनी देशाच्या प्रगतीचे आणि क्षमतेचे कौतुकही केले आहे. यावरून चुकीची माहिती आणि संदर्भाचा अभाव लोकांच्या धारणा कशा बदलू शकतात, हे स्पष्ट होते.

या संपूर्ण चर्चेच्या केंद्रस्थानी राजकारणातील भाषेची भूमिका आहे. शब्दांमध्ये प्रचंड सामर्थ्य असते—ते लोकांना एकत्र आणू शकतात किंवा दुभंगू शकतात; ते प्रेरणा देऊ शकतात किंवा चिथावणीही देऊ शकतात. राजकीय नेते अनेकदा लोकांचे लक्ष वेधण्यासाठी आणि आपली भूमिका ठामपणे मांडण्यासाठी कठोर व वादग्रस्त भाषेचा वापर करतात. तथापि, अशा भाषेमुळे समाजात दुभंग वाढू शकतो, गैरसमज पसरू शकतात आणि आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. म्हणूनच, भाषा हे केवळ अभिव्यक्तीचे माध्यम नसून ती एक जबाबदारी आहे.

परस्परांशी जोडलेल्या या जगात, एका देशात उच्चारल्या गेलेल्या शब्दांचे दुसऱ्या देशात दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्यामुळेच जागतिक नेत्यांनी जबाबदार, संतुलित आणि आदरपूर्ण भाषेचा वापर करावा, अशी अपेक्षा असते. कोणत्याही लोकशाहीमध्ये टीका होणे आवश्यक असते, परंतु ती विधायक आणि सन्मानजनक असावी. कोणत्याही राष्ट्रासमोरील आव्हानांवर भाष्य करताना त्या राष्ट्रातील लोकांचा सन्मान राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

अखेरीस, ‘अँकर बेबीज’ आणि ‘नरकसदृश देश’ या संज्ञांभोवतीच्या चर्चेतून आपल्याला एक महत्त्वाचा धडा मिळतो—शब्द हे केवळ ध्वनी नसतात; ते विचारसरणीला आकार देतात आणि वास्तवावर प्रभाव टाकतात. एक जागतिक समाज म्हणून आपण कोणत्या दिशेने वाटचाल करत आहोत, याचा विचार करताना अंतर्मुख होणेही अत्यावश्यक आहे. कोणत्याही राष्ट्राची खरी ओळख केवळ त्याच्या नागरिकत्वाच्या दर्जात नसून त्याच्या मूल्ये, संस्कृती आणि मानवी प्रतिष्ठेत दडलेली असते.

एकूणच, संतुलित, संवेदनशील आणि जबाबदार भाषा हाच अर्थपूर्ण जागतिक संवादाचा खरा पाया आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# जिजामाता नर्सिंग कॉलेज माजलगाव मध्ये ‘लॅम्प लायटिंग’ व स्नेहसंमेलन थाटात संपन्न

माजलगाव, ( अनंत घडसिंगे ) :

माजलगाव येथील जिजामाता नर्सिंग कॉलेजमध्ये नुकताच ‘लॅम्प लायटिंग’ सोहळा आणि वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडले. ज्ञान, सेवा, समर्पण आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम या कार्यक्रमात अनुभवायला मिळाला. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणारा हा सोहळा अविस्मरणीय ठरला.



कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मंगलाताई प्रकाश सोळंके, एस.आर.टी.आर. मेडिकल कॉलेज अंबाजोगाईचे डीन डॉ. शंकर धपाटे, टी.एन.ए.आय. महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष राजाभाऊ पापालाल राठोड, लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन जयसिंग (भैय्या) सोळंके, प्राचार्य एन. विनोथ कुमार, सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख, तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.लॅम्प लायटिंग सोहळा हा नर्सिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या वेळी विद्यार्थ्यांनी हातात दिवा घेऊन सेवा, समर्पण आणि मानवतेची शपथ घेतली. या प्रसंगी बोलताना मंगलाताई सोळंके यांनी सांगितले की, “शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळवणे नसून समाजासाठी एक जबाबदार आणि संवेदनशील व्यक्ती बनणे हा आहे. नर्सिंग क्षेत्रात काम करताना रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यातून कॉलेजचे नाव उज्ज्वल करावे.”डॉ. शंकर धपाटे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना नर्सिंग क्षेत्रातील जबाबदाऱ्या आणि संधी यावर प्रकाश टाकला. तसेच प्राचार्य एन. विनोथ कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजने शैक्षणिक गुणवत्तेत केलेल्या प्रगतीबद्दल त्यांनी विशेष अभिनंदन केले. राजाभाऊ राठोड यांनी विद्यार्थ्यांना नर्सिंग क्षेत्रातील विविध कोर्सेस, उच्च शिक्षणाच्या संधी आणि करिअर मार्गांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरही नर्सिंग क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले.

जयसिंग सोळंके यांनी आपल्या भाषणात पोलिओ आणि कुष्ठरोग (लेप्रसी) यांसारख्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यात नर्सेसचे मोठे योगदान असल्याचे अधोरेखित केले आणि त्यांच्या सेवाभावाचे कौतुक केले. लॅम्प लायटिंगच्या गंभीर आणि प्रेरणादायी वातावरणानंतर स्नेहसंमेलनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहाला उधाण आले. विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.लोकनृत्य, आधुनिक नृत्य, नाटिका, गीते अशा विविध कार्यक्रमांनी सभागृह दणाणून गेले. विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थ्यांनी हातात मेणबत्त्या घेऊन ‘नर्सिंग’ हा शब्द साकारला. या अनोख्या उपक्रमाने उपस्थितांवर प्रभाव पाडला आणि मान्यवरांनी त्याचे विशेष कौतुक केले.

यावेळी कॉलेजच्या शैक्षणिक प्रगतीबाबतही माहिती देण्यात आली. निकालात झालेली वाढ आणि विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीचा गौरव करण्यात आला.पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे पालकांनी मनापासून कौतुक केले. संपूर्ण कार्यक्रमात आनंद, अभिमान आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले होते.गुणवंतांचा गौरव आणि समारोप कार्यक्रमाच्या शेवटी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी प्रभावीपणे केले. उपप्राचार्य प्रवीण कुमार, कार्यालय अधीक्षक वाघ सर, तसेच प्रदीप सर, शिंदे सर, जगताप सर, इरफान पठाण सर, रासवे सर, सीरसट सर, वगरे सर आणि सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

2019 मध्ये 46.8 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती. त्यांनतर सात वर्षांनी एप्रिल महिन्यातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद रविवारी झाली. येथे 46.8 अंश सेल्सिअस कमाल नोंदले गेले . तर वर्धा येथे एप्रिल 1996 मध्ये 46.4 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती. येथे तीस वर्षांनी रविवारी पुन्हा एकदा 46.4 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.दरम्यान, अकोला, अमरावती आणि वर्धा आदी जिल्ह्यांत उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती लक्षात घेऊन या भागांना सोमवारी 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. मराठवाड्यातील कमाल तापमानातही वाढ नोंदली जात असून या प्रदेशातील सर्वाधिक तापमान छत्रपती संभाजीनगर येथे 43.4 अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले. तसेच नागपूर, चंद्रपूर, भंडारा, बुलढाणा आदी भागात सोमवारी उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली असून या भागांना उष्णतेचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.मुंबई, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी येथे रविवारी उष्ण आणि दमट वातावरणाची नोंद झाली. त्यामुळे या भागात आर्द्रतेचे प्रमाण अधिक असल्याने नागरिकांना घामाच्या धारांचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळीही आर्द्रतेचे प्रमाण अधिक असल्याने उकाड्यात लक्षणीय वाढ झाली आहे. दरम्यान, सोमवारपासून कोकण प्रांतात हवामान कोरडे राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

कोकण प्रातांत सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद रविवारी डहाणू येथे झाली. येथे 37.4 अंश सेल्सिअस इतके कमाल तापमान नोंदले गेले. तर मुंबईत हवामान केंद्राच्या सांताक्रूझ केंद्रात 33.8 तर कुलाबा केंद्रात 34.4 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान, मुंबई शहरात सोमवारी कमाल तापमान 34 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 25 अंश राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. वाढलेल्या आद्रतेमुळे असलेल्या तापमानापेक्षा जवळपास 2 अंश सेल्सिअसने ते अधिक वाटत होते.राज्यात सध्या प्रतिचक्रवाती स्थिती आहे. यामुळे विदर्भ, मध्य महाराष्ट्रातील कमाल तापमानात वाढ झाली आहे. पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव आता पूर्वेकडे सरकत असून पुढील काही दिवस विदर्भावर त्याचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिचक्रवाती स्थितीचा प्रभाव कमी होण्याचा अंदाज असून यामुळे विदर्भासह राज्यभरातील बहुतांश भागांना तीव्र उन्हापासून दिलासा मिळण्याची शक्यता आहे. – एस. डी. सानप, शास्त्रज्ञ, हवामान विभाग, पुणे

---

करण्यात आलेल्या पाणीपुरवठा सुधारणांच्या प्रस्तावास 15 व्या वित्त आयोगांतर्गत जिल्हाधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाली आहे. 15 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार, 'बद्ध अनुदानातून' निधी पाणीपुरवठा आणि जलपुनर्भरण कामांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने या कामांना तांत्रिक मान्यता दिली होती, ज्यावर आता प्रशासकीय मंजुरीची मोहोर उमटली आहे. मंजूर करण्यात आलेल्या निधीतून शहरातील 1. नगर परिषद कार्यालयाजवळील पाण्याची टाकी दुरुस्ती.,2. मोंढा परिसरातील पाण्याच्या टाकीची दुरुस्ती. 3. उड्डाणपूल परिसरातील पाण्याच्या टाकीची दुरुस्ती.,4. शिवाजीनगर थर्मल येथील पाण्याच्या टाकीची दुरुस्ती., 5. उड्डाणपूल परिसरातील दुसऱ्या जलकुंभाची दुरुस्ती अशी पाच जलकुंभांची दुरुस्ती तातडीने करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या मंजुरीमुळे परळी शहरातील अनेक जुन्या पाणी टाक्यांची दुरुस्ती होऊन पाणी गळती थांबण्यास आणि नागरिकांना नियमित पाणी मिळण्यास मदत होईल, असा विश्वास नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजाखान पठाण, पाणीपुरवठा सभापती सौ जयश्रीताई गीते, मुख्याधिकारी पी. एन. निगळ यांनी व्यक्त केला आहे.

*पाच जलकुंभ दुरुस्तीची होणार परिपूर्ण कामे.....*

दरम्यान या मंजूर लेखीतून परळी शहराच्या पाणीपुरवठासाठी मुख्य असलेल्या पाच जल कुंभांची परिपूर्ण दुरुस्तीची कामे हाती घेतली जाणार आहेत. यामध्ये जलकुंभामधील गाळ काढणे, आतून प्लास्टर, कलर ,नविन वॉल, फॅब्रिकेशनच्या शिडी भेगा भरणे व काँक्रीट दुरुस्ती, गंजलेले स्टील दुरुस्त करणे, छत/भिंतींचे मजबुतीकरण, जल कुंभार लिकेज थांबवण्यासाठी केमिकल कोटिंग,आतील बाजूस फूड-ग्रेड वॉटरप्रूफिंग, क्लोरीनेशन करून निर्जंतुकीकरण, इनलेट/आउटलेट पाइप तपासणी,व्हॉल्व्ह, फ्लोट व्हॉल्व्ह बदलणे,बाहेरील रंगकाम सुरक्षा रेलिंग, जिने दुरुस्ती तसेच आवश्यक त्या सर्व दुरुस्त्या केला जाणार आहेत.

---

महासंघाची लोक आपलीच आहेत. आम्ही आपसात भांडलो तर इतरांना संधी मिळेल. शिवाजी महाराजांना संत-महंत, गुरुप्रती किती आदर होता, हे सांगण्याचा प्रयत्न मी दोन दिवसांपूर्वी केला. परंतु प्रसार माध्यमांनी ते चुकीच्या पद्धतीने मांडले. शिवाजी महाराजांबद्दल स्वप्नातही कोणी अपशब्द काढल्यास मी ते सहन करू शकत नाही. हिंदुत्वाच्या प्रसारासाठी लवकरच रथयात्रा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, भारतात, महाराष्ट्रात लव्ह जिहादचे प्रमाण वाढले आहे. सोशल मिडियावर चांगले दिसून चांगले बोलून हिंदु मुलींना जाळ्यात ओढल्यानंतर त्यांच्यावर आपला धर्म लादला जात आहे.

मध्यप्रदेशात मागील वर्षी लव्ह जिहादची 280 प्रकरणे घडली. प्रेम करणे चुकीचे नाही. पण संस्कृतीचे हनन योग्य नाही. त्यासाठी हिंदु धर्मविरोधी ताकदींना वेळीच पायबंद घालण्याची गरज असून त्यासाठी कठोर कायदा करण्याची गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याकडे लक्ष देतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या आव्हानाबाबत ते म्हणाले, आम्हाला कोणालाही प्रमाण देण्याची गरज नाही. आम्ही स्व:तशी जोडण्यासाठी नव्हे तर हनुमानाशी जोडण्यासाठी भाविकांना दरबारात बोलावतो. परंतु संतांना तुच्छ लेखण्याचा प्रयत्न काहीजण करीत असल्याचे त्यांनी सांगितले

---

लाडकी बहीण योजनेत महत्वाची अट होती की, लाडकी बहीण योजनेसाठी सरकारी कर्मचारी महिला अर्ज करु शकत नाही. मात्र, अनेक सरकारी नोकरी करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेसाठी अर्ज केला. आता हळू हळू याबाबतची माहिती पुढे येत आहे. थेटपणे या लाडक्या बहिणींकडून सरकारकडून वसुली केली जात आहे.

---

विश्वास यावेळी स्थानिक नेत्यांनी व्यक्त केला. सत्काराला उत्तर देताना डॉ.प्रीतमताई मुंडे म्हणाल्या, "पक्षाने दिलेली नवीन जबाबदारी मी निष्ठेने पार पाडेन. छत्रपती संभाजीनगर पश्चिम जिल्ह्यात केंद्र आणि राज्य सरकारच्या जनहितकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत." तसेच त्यांनी आगामी काळात पक्ष संघटन अधिक सक्षम करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी हेवेदावे विसरुन एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

या सत्कार समारंभाप्रसंगी भाजपचे अरुण आबा राऊत, डॉ. अशोक तिडके, ज्ञानेश्वर मेंडके, रुपाली कचरे, विनायक रत्नपारखी, दिपक मुंडे, ज्ञानेश्वर सरवदे, प्रदिप जाधवर, अभय होके, कल्याण शेप, खय्युम पठाण, आनंद जगताप, सतिष जोशी, राजेश मिटकरी, बाळासाहेब क्षीरसागर, राम शिंदे, दत्ता महाजन, सागर खुर्पे यांच्या सह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

या सत्कार कार्यक्रमा दरम्यान माजलगाव परिसरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळाला. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांनी आणि समर्थकांनी प्रीतमताईंना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा ठराव मंजूर करण्यात आला. यासोबतच नागरिकांना शासकीय वैद्यकीय योजनांचा लाभ सुलभ, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा यासाठी नगर परिषद कार्यालयात स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष स्थापन करण्यालाही मंजुरी देण्यात आली. या बैठकीस स्थायी समिती सदस्य वैजनाथ सोळंके, पवन मुंडे, जयश्री गित्ते, योगेश मेनकुदळे, अंजली माळी, उपमुख्य अधिकारी संतोष रोडे तसेच विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, धार्मिक भावना जपत घेतलेला हा निर्णय परळीच्या धार्मिक महत्त्वाला अधिक अधोरेखित करणारा ठरला असून, भाविकांच्या हिताचा व शहराच्या संस्कृतीशी सुसंगत असा हा ठराव असल्याचे मत व्यक्त होत आहे.परळी वैजनाथ हे देशातील एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ असून येथे येणाऱ्या भाविकांच्या भावना जपणे ही आमची जबाबदारी आहे. अनेक वर्षांपासून नागरिक व शिवभक्तांकडून सोमवारी मांसविक्री बंद ठेवण्याची मागणी होत होती. त्या पार्श्वभूमीवर स्थायी समितीने एकमताने हा निर्णय घेतला आहे. शहराची पवित्रता, धार्मिक वातावरण आणि भाविकांचा सन्मान राखण्यासाठी हा ठराव महत्त्वाचा ठरेल, असे मत नगराध्यक्षा तथा स्थायी समितीच्या अध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

---

करुन विनम्र अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान बोलताना प्रदीप भैय्या मुंडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना समतेचा, न्यायाचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार मिळवून दिला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी अभिवादन ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी गावातील मान्यवरांनी आधारित भाषणे, प्रबोधनपर विचार आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष माणिक घाडगे, छगन घाडगे प्रमुख पाहुणे म्हणून महादेव मुळे, माजी सरपंच बळीराम आघाव, शहाणिक तात्या कराड, राम किसन घाडगे, भानुदास आघाव, महादेव सोमोसे, श्रीमंत राख, युवराज नानवटे , ग्रामपंचायत सदस्य अंकुश राख, कल्याण नानवटे, गोविंदा आघाव, बाळा गायके, अशोक आघाव, मुंजा कराड, धनंजय घाडगे, चंद्रमणी घाडगे, मुन्ना घाडगे, विष्णू वाघ, अरुण आघाव, हरिभाऊ घाडगे, करण गायकवाड, नितीन सावंत, शेख आयुब आदीसह बौद्ध उपासक उपासिका आणि गावातील नागरिक महिला युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान 4 वरुन

निनादात लेझीमच्या साथीने भव्य मिरवणूक काढली.गावातुन ही मिरवणूक तांड्यावर गेल्यानंतर जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेचे लोकार्पण केले.यावेळी जागोजागी फुलचंदभाऊंचे औक्षण करण्यात आले.यानंतर ही मिरवणूक गावातील हनुमान मंदिर शेजारी नव्याने बांधण्यात आलेल्या सुसज्ज अशा ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.फुलचंद भाऊंनी लिंबुटा गाव लिंबुटा तांड्यामध्ये 100 वर्षापासुन असलेला पाणी प्रश्न सोडवण्यासाठी नागापूर येथील वाण धरणातुन पाइपलाइनद्वारे पाणी आणत प्रत्येक घरोघरी नळ उपलब्ध करुन दिले.गत 100 वर्षापासुन ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत नसल्याने ग्रामस्थांची ही अडचण दुर करण्यासाठी दोन रुम,शौचालय अशी सुसज्ज इमारत उभारली.लिंबुटा गाव तांडा अशी मिळुन 140 घरकुल दिले.ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत लोकार्पनानंतर हनुमान मंदिरात झालेल्या सोहळ्यात बोलताना कराड यांनी सांगितले की लिंबुटा गाव मी प्रगतीपथावर आणलेले आहे.लिंबुटा तांड्यासाठी पांगरी रस्ता,रिंग रोड तसेच प्रत्येकांसाठी घरकुल मंजुर करुन दिलेले आहे.गावचा विकास हेच आपले ध्येय असल्याने व पुढील आयुष्यात लिंबुटा गाव महाराष्ट्रात विकसित व आदर्श गाव म्हणून पुढे आणणार आहे.मला गावच्या या विकास कामांमध्ये गावकर्यांची कायम साथ राहिलेली आहे.येणार्या काळात गावच्या विकासासाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजनांमधुन निधी आणणार असल्याचे सांगितले.या कार्यक्रमात विविध परिक्षांमध्ये यश संपादन केलेल्या व शासकीय सेवेत लागलेल्या विद्यार्थी,युवकांचा फुलचंदराव कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी दैवशाला बनसोडे (सरपंच),प्रकाश नाईक (उपसरपंच),माऊली फड (तालुका समन्वय शिवसेना) रवि कराड अरला मुंडे (माजी उपसरपंच), जयराम मुंडे,इंद्रमोहण मुंडे (ग्रा. प. सदस्य),रमेश चव्हाण, राठोड (ग्राममविकास अधिकारी), प्रशांत कराड,महादेव कराड,सुदाम मुंडे (माजी सरपंच) देविदास कराड,रमेश चव्हाण,भाऊसाहेब डिघोळे,विश्वनाथ आबा मुंडे,मंचक मुंडे,बाबुराव लक्ष्मण दिवटे (पोलीस पाटील) विजय राठोड(ग्रा.वि.अ.),मनोज मुंडे,बाबूराव मुंडे, निलेश बनसोडे,रवि बनसोडे सहदेव करोड,आच्चुत कराड,राणेभार मुंडे आदि उपस्थित होते

---

हस्तक्षेप केला. मात्र यानंतर हा वाद पोलीस स्टेशनकडे गेला बघता बघता दोन्ही समाजातील लोकांनी पोलिस ठाण्यासमोर गर्दी केली आणि वादाने मोठे स्वरुप प्राप्त करीत ठाण्यासमोर एकमेकांवर दगडफेक सुरु केली .

पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी परिस्थिती नियंत्रणत ठेवण्यासाठी बीड येथून अतिरिक्त पोलिसाची कुमक मागवत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले . वै. बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी सकाळीच अखंड हरिनाम सप्ताह उभा राहिला असून या कीर्तनासाठी जाणाऱ्या रिक्षा चालकासह महिलेला मारहाण झाल्याच्या वृत्ताने नेकनूरमध्ये संतापाची लाट उसळली यामुळे नेकनुर अशांत झाल्याचे पहायला मिळाले.

केजचे पोलिस उपअधीक्षक हे रात्री नेकनूरमध्ये परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. पोलिसाच्या फिर्यादीवरुन दोन्ही गटातील लोकांवर पुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही जणांना ताब्यात घेतल्याची माहिती असून नेकनुरचा रविवारचा आठवडी बाजार यामुळे बंद राहिला.

---

चल, मी तुझ्याशी लग्न करतो," असे म्हणत त्याने तिचे कपडे ओढून गैरवर्तन केले. महिलेने प्रतिकार केला असता, आरोपीने तिला उचलून जमिनीवर आदळले आणि दगडाने मारहाण केली. या वादात आरोपीची आई तायनाबाई विष्णू ढाकणे ही देखील सामील झाली. दोघांनी मिळून महिलेला अश्लील शिवीगाळ केली. तसेच, "जर पोलीस ठाण्यात तक्रार केली, तर तुला जिवंत सोडणार नाही," अशी धमकीही दिली.या छळवणुकीनंतर पीडित महिलेने केज पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून डिगांबर ढाकणे आणि तायनाबाई ढाकणे यांच्या विरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर 337/2026 नुसार भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम 74, 115(2), 118(1), 351(2), 352, 3(5) कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस जमादार उमेश आघाव हे करत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

---

घेत 'एकता फाउंडेशन'च्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले.

या सोहळ्याला एकता फाउंडेशनचे अध्यक्ष अनंत कराड, साहित्यिक प्रा. डॉ. संगीता घुगे, फाउंडेशनचे सचिव गोकुळ पवार, ज्येष्ठ बाल साहित्यिक पु. ना. बारडकर, मुख्य संपादक के. बी. शेख, कार्यकारी संपादक प्रा. इमरान शेख, विभागीय अध्यक्ष प्रा. प्रकाश वाकळे, महानगरीय अध्यक्षा प्रा. शोभाताई घुंगरे-गवळे, उपजिल्हाध्यक्षा प्रा. मेघा सुनील नांदखेडकर, प्रदेश संघटक मल्हारी खेडकर आणि प्रदेश निमंत्रक देविदास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुरस्काराला उत्तर देताना डॉ. सिद्धार्थ तायडे भावूक झाले होते. ते म्हणाले की, "हा सन्मान केवळ माझा गौरव नसून माझ्या जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. मी हा पुरस्कार आमचे दिवंगत सन्मित्र आणि लातूरचे सर्जनशील रंगकर्मी कल्याण वाघमारे यांच्या पवित्र स्मृतीस सविनय अर्पण करत आहे."

डॉ. सिद्धार्थ तायडे यांना मिळालेल्या या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे शैक्षणिक, साहित्यिक आणि कला क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

आणि निवडणुकीची तयारी

सशक्त करण्यासाठी बीड जिल्हा महिला आघाडीची आढावा बैठक आंबेजोगाई येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस शिवसेना महिला संपर्क प्रमुख बीड, धाराशिव, तथा महाराष्ट्र राज्य महीला आयोगाच्या सदस्य अँड. संगीता चव्हाण यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

---

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित करणारा हा उपक्रम विशेष ठरला. "एक व्यक्ती, एक वृक्ष" या संकल्पनेतून अनेकांनी झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात विविध मान्यवरांनी पुरुषोत्तम वीर यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव करत त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. त्यांच्या कार्याचा आढावा घेताना अनेकांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी बीड शहरातील नवोदित गायक-गायिकांनी सुमधुर गीतांनी वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी खास जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली होती.

साधेपणा, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम साधणारा हा वाढदिवस सोहळा उपस्थितांच्या मनात विशेष ठसा उमटवून गेला.

---

आयोजकांकडून करण्यात आले आहे.
संपर्क – 9689899108, 9552531017

---

झुंबर व त्यांचे भाऊ शिवाजी चाटे यांनी शेतीमाल विक्रीचे ठेवलेले 2 लाख रुपये असा 2 लाख 90 हजार रुपयांचा ऐवज घेऊन चोरट्यांनी माणिक यशवंत चाटे यांच्या घरी गेले. त्यांच्या घरातील शेतीमाल विक्रीचे 25 हजार रुपये व दीड हजाराची घड्याळ घेऊन सखाराम जनार्धन चाटे यांच्या घरी गेले. त्यांच्या घरातील नगदी पाच हजार रुपये घेऊन चोरटे आशाबाई भिमराव चाटे यांच्या घरात गेले. त्यांच्या घराची झडती घेऊन नगदी 6 हजार रुपये व सहा हजार रुपयांचे सोन्याचे मणी घेऊन चोरट्यांनी गावातून पोबारा केला.

दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी श्वान पथक व ठसे तज्ज्ञांचे पथक पाचारण करण्यात आले होते. शंकर चाटे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यां विरुद्ध गु. र. नं. 239/2026 भा. न्या. सं. 305(ए), 331(4) नुसार केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने हे करीत आहेत.

---

असे या आपघातात झालेल्या तरुणाचे नावे आहेत. शनिवारी कपडे खरेदी करण्यास बीडला गेले होते.खरेदी झाल्यानंतर ही दोन्ही तरुण रात्री उशिरा गाव जातेगाव कडे परत असताना साधारण साडेआठ वाजेच्या सुमारास धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाडळसिंगी उड्डाण पूलाजववळ आज्ञात वाहनाने धडक दिल्याने अभिजीत पवार व अभिजीत राठोड या दोघांचा जागीच मृत्यू झाला.या आपघाताची वाहतूक पोलीसांना मिळताच दोन्ही मृत तरुण यांचे मृतदेह उत्तरीय तपासणीस बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.रविवारी उत्तरीय तपासणीनंतर अभिजीत पवार आणि अभिजीत राठोड या दोघांवर गाव जातेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.झालेल्या दुर्घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

---

शरणांगत, विक्रम शरणांगत, धम्मपाल शरणांगत यांनी ही माहिती दिली आहे.

---

प्रतिनिधी, पुण्यनगरी), रमेश मस्के उपस्थित होते.

एस.के.एस. क्लासेसचे संचालक इम्रान शेख व त्यांची टिम नेहमीच आपल्या विद्यार्थ्यांसाठी काही ना काही धडपड करत असल्याचे वारंवार दिसून येते. एस.के. एस. च्या विद्यार्थ्यांनी यावर्षी विविध परिक्षांमध्ये मोठी गगनभरारी घेतली असून यामध्ये राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत देशभरातील 6000 विद्यार्थ्यांमधून क्लासेसचे 16 राष्ट्रीय विजेते ज्यातील दोन विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय विजेते पदाला गावसणी घातली, म्हणजेच देशातून प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान - रुद्र आत्माराम नवले व श्वेता रमेश मस्के या दोन विद्यार्थ्यांना मिळाला.एन.एम.एम.एस. परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात अकरा विद्यार्थी नशिब आजमावून पास होवून यश संपादन केले तर सायन्स व मॅथ इंटरनॅशनल ऑलंपियाड मध्ये एकूण 36 मेडल व चार विद्यार्थी लेवल दोन साठी पात्र झाले आहेत. डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत इयत्ता सहावी व नववी मधून 16 विद्यार्थी पास व एक विद्यार्थिनी लेवल दोन साठी पात्र ठरली आहे. त्याचबरोबर क्लासेसच्या अभ्यासावर आधारित 26 विद्यार्थ्यांना आऊटस्टँडिंग रिझल्ट हा सर्वात मोठा पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यानंतर 18 विद्यार्थ्यांना कॉन्स्टंट रिझल्ट हा पुरस्कार देण्यात आला तसेच 32 विद्यार्थ्यांना इम्प्रुव्हमेंट रिझल्ट अवॉर्ड जाहीर झाला. असल्याने मोठा उत्साह निर्माण झाला आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही थोड्या गोष्टी कमी राहिलेल्या 27 विद्यार्थ्यांची बेस्ट परफॉर्मर अवॉर्ड मध्ये निवड करण्यात आली. यशस्वी विद्यार्थ्यांना दि. 22 एप्रिल रोजी मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, पुष्पगुच्छा देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास विशेष उपस्थितीमध्ये दत्ता आजबे दै. पुढारी, आप्पासाहेब महानोर दै. पुण्यनगरी, गणेश जाधव उपसंपादक दै. दिव्य मराठी,नितीन चव्हाण उपसंपादक दै. सकाळ, धनंजय जोगडे उपसंपादक दै. कार्यारंभ, अभिषेक सोळंके उपसंपादक दै. प्रजापत्र व लक्ष्मीकांत लिमकर सिनिअर टेक्रेशियन, महावितरण यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी देखन्या साहळ्यामध्ये सन्मान झाल्याने विद्यार्थी भारावून गेले होते. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामध्ये एस.के.एस.चे संचालक इम्रान शेख व त्यांच्या टिमचे तोंडभरून कौतुक केले. क्लासेसच्या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मान्यवरांनी देखील कौतूक केले. क्लासेसच्या सर्व शिक्षक वृंदाला क्लासेसच्या वतीने बेस्ट टीचर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

चौकट

दोन विद्यार्थ्यांना सायकल भेट

अबॅकस स्पर्धेत देशातून प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान मिळविणाऱ्या रुद्र आत्माराम नवले व श्वेता रमेश मस्के या दोन विद्यार्थ्यांना सायकलचा प्रथम पुरस्कार देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यार्थी व पालक भारावून गेल्याचे दिसून आले. तसेच यावेळी अत्यंत उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्यचे चित्र यावेळी दिसून आले.

---

परिसर दणाणून सोडला होता. "अक्षय्य तृतीया" हा दिवस भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव म्हणून साजरा केला जातो, त्यानिमित्ताने समाजातील एकता आणि भक्ती वाढवण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

या सोहळ्याला परशुराम हिंदू सेवा संघाचे प्रदेश संघटन सरचिटणीस डॉ. प्रशांत पाटील, प्रदेश सरचिटणीस विनायक रत्नपारखी भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके परशुराम हिंदू सेवा संघांचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद दळवी जिल्हा सचिव कैलास जोशी ता. अध्यक्ष हरिभाऊ नवले उपाध्यक्ष डॉ. सचिन देशमुख बप्पासाहेब देशमुख बाळासाहेब कुलकर्णी डॉ. दीपक जोशी दत्ता महाजन भालचंद्र रामभाऊ कुलकर्णी सारंग पाठक खेर्डेकर मुरली देशपांडे पद्माकरराव जोशी सतीश जोशी भालचंद्र पाठक गोपाळ कुलकर्णी दत्तात्रय देशमुख सत्यप्रेम देशमुख दामोदर संधिकर अविनाश कांडुरे विनोद लड्डा यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य आणि शहरातील महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरतीनंतर उपस्थित भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले.

"भगवान परशुराम हे न्याय आणि पराक्रमाचे प्रतीक आहेत. त्यांचा आदर्श तरुणांनी डोळ्यासमोर ठेवावा, या उद्देशाने दरवर्षी हा जन्मोत्सव साजरा केला जातो," अशी भावना यावेळी डॉ. प्रशांत पाटील यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परशुराम हिंदू सेवा संघाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. बालाजी मंदिर परिसरातील या भक्तीमय सोहळ्याची शहरात सर्वत्र चर्चा होती.

---

बांधवांमधून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

जयभीम,जय लहूजीचा नारा देत अमोल शेरकर हा सर्व सामान्य कुटुंबातील ध्येयवादी तरुण शिक्षण संवाद यात्रेद्वारे मांगवाड्यांमध्ये पोहोचत शिक्षणाचे महत्त्व पटवून देत आहे.त्यांच्या मते,समाजाचा खरा विकास हा शिक्षणातूनच शक्य आहे.पारंपरिक कामांच्या चौकटीत अडकून राहिलेल्या समाजाला नव्या विचारांची दिशा देणे,हीच त्यांची धडपड आहे. गावोगावी जाऊन तो पालकांशी संवाद साधत आहे.आज आपण कष्ट करतोय,पण आपल्या मुलांनी तेच आयुष्य जगू नये,हा संदेश तो प्रभावीपणे समाज बांधवांमध्ये मांडत आहे.वीटभट्टी,ऊसतोडणी आणि शेतमजुरीच्या चक्रात अडकलेल्या कुटुंबांना शिक्षणाचे सामर्थ्य समजावून सांगत त्यांनी एक पिढी कष्ट करेल,पण पुढची पिढी शिकेल,हा विचार तो रुजवत आहे.अमोल शेरकर केवळ भाषणांपुरते मर्यादित नाहीत.ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन,स्पर्धा परीक्षा माहिती,तसेच शिक्षणासाठी आवश्यक दिशा देण्याचे कामही करत आहेत.त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांमध्ये शिक्षणाबद्दल सकारात्मक बदल दिसू लागला आहे.तालुक्यातील गाव वस्त्यावरील त्यांच्या आयोजित कार्यक्रमांना विद्यार्थ्यांमधून मोठा प्रतिसाद मिळत आहे.समाजात काही यशस्वी अधिकारी,प्राध्यापक आहेत,मात्र त्यांची संख्या अपुरी असल्याची जाणीव अमोल शेरकर याने समाजाला करून देते शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करीत आहेत. त्यामुळेच ते प्रत्येक मांगवाड्यातून किमान एक तरी अधिकारी, इंजिनिअर,वकील घडावा,या ध्येयाने काम करत आहेत. अमोल शेरकर यांची ही धडपड केवळ एका व्यक्तीची नाही,तर संपूर्ण समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा लढा आहे.त्यांच्या या प्रयत्नामुळे मातंग समाजातील शैक्षणिक अंधार दूर होऊन,नव्या उजेडाची पहाट लवकरच दिसेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान मातंग समाजातील अमोल शेरकर यांनी स्वखर्चातून समाजाच्या भल्यासाठी सुरु केलेली संवाद यात्रा शिक्षण क्रांतीस गती देणार असल्याचे चिन्ह असून त्यांच्या या संवाद यात्रेला मोठा प्रतिसाद मिळत आहे.अमोल

शेरकर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---

## बागेश्वर बाबांचं छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त वक्तव्य; संभाजीराजेंचा संताप



बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर बाबा) यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्याबद्दल बोलताना एक वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. यावरुन आता चांगलंच वातावरण तापलं आहे.'छत्रपती शिवाजी महाराज जेव्हा युद्ध करता करता थकले, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांना वाटलं की आता आपण थकलोय, तेव्हा एक दिवस छत्रपती शिवाजी महाराज समर्थ रामदास स्वामी यांच्याकडे गेले आणि आपला मुकुट काढला व सांगितले की, मी अनेक लढाई लढलो, अनेक युद्ध केले, पण आता पुढे लढायचे नाही. तुम्ही एक दया करा की, हा मुकुट तुम्ही आता सांभाळा, हे राज्य सांभाळा.' असं वादग्रस्त विधान बागेश्वर बाबा यांनी केलं होतं. यावरुन आता संभाजीराजे छत्रपती यांनी बागेश्वर बाबा यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे, त्यांनी ट्विट करत आपला संताप व्यक्त केला.'धीरेंद्र शास्त्री ज्या राज्यातील आहे, त्या राज्यातील महान सेनानी छत्रसाल बुंदेला यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांशी लढून स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची प्रेरणा दिली होती. हा स्वतःच्या राज्याचा इतिहास माहिती नसणारा व्यक्ती महाराष्ट्रात येऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा कपोलकल्पित आणि दिशाभूल करणारा इतिहास सांगतो, लढाया करून महाराज थकले म्हणतो आणि लोक त्याच्या समोर बसून टाळ्या वाजवजात, राज्यात त्याचे मोठमोठे कार्यक्रम घेतात, हे अत्यंत दुर्दैवी आहे. अशा भोंदू बाबांना मोठे करणाऱ्या लोकांना आणि राजकारण्यांना सरळ केले पाहिजे. राज्य शासनाने या भोंदू बाबाला राज्यात कार्यक्रम घेण्यास बंदी घालावी.' असं ट्विट संभाजीराजे यांनी केलं आहे. दरम्यान दुसरीकडे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील बागेश्वर बाबा यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'विकृत धीरेंद्र शास्त्रीने (बागेश्वर बाबा) छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल गरळ ओकली आणि तरीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याच विकृताचा उल्लेख 'साधू-संत' असा केला. हा महाराष्ट्राच्या महान संत परंपरेचा अपमानच आहे. संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराजांपासून ते आधुनिक काळातील गाडगे बाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या वाणी आणि लेखणीने समृद्ध केलेल्या संत परंपरेशी या ढोंगी बागेश्वर बाबाला जोडताना देवेंद्र फडणवीसांना लाज वाटली पाहिजे. त्यांच्या बुद्धीची कीव करावी तेवढी थोडीच आहे.' असं ट्विट हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं आहे.

हॅलो बीड

परळी संघर्षनेता

सोमवार दि. 27 एप्रिल 2026



# लिंबुटा गाव व तांड्याच्या विकासासाठी निधी कमी पडु देणार नाही-फुलचंदराव कराड

## लिंबुटा ग्रामपंचायत इमारत,तांड्यावरील नळयोजनेचे कराड यांच्या हस्ते लोकार्पण






परळी (प्रतिनिधी) लिंबुटा गावातील प्रत्येक नागरीकांसाठी तसेच गावात सार्वजनिक विकासासाठी आतापर्यंत मी कधीच निधी कमी पडु दिलेला नाही व यापुढेही शासनाच्या अनेक योजना गावात राबवुन विकसित लिंबुटा गाव करणार असल्याची ग्वाही शिवसेनेचे महाराष्ट्र समन्वयक तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड यांनी दिली.लिंबुटा येथील ग्रामपंचायत इमारत,लिंबुटा तांड्यावरील जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे लोकार्पण व स्मशानभूमी रिंगरोडचे भुमिपुजन कराड यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

लिंबुटा येथील नागरीकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या ग्रामपंचायत कार्यालय इमारत व लिंबुटा तांड्यावरील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या लोकार्पण कार्यक्रमासाठी गावात गेल्यानंतर लिंबुटा चौक येथुन आपले नेते फुलचंदराव कराड यांची ढोल,ताशे,सनईच्या पान 3 वर

# शुल्लक अपघाताने रिक्षातील महिलेला मारहाण , नेकनूरमध्ये दोन गट भिडले


## पोलिस स्टेशनसमोरच एकमेकावर दगडफेक



नेकनुर : नेकनुरच्या बसस्थानकासमोर दुचाकीस्वाराला रिक्षाचा कट बसला या शुल्लक कारणातून दुचाकीस्वार रिक्षाचालकाला अडवून मारहाण करु लागला या रिक्षात बसलेल्या महिलेला मारहाण होत असल्याचे दिसताच काहींनी धाव घेतली यांनतर हा वाद पोलिस ठाण्यात पोहचला मात्र दोन्ही गट या ठिकाणी जमा झाल्याने ठाण्यासमोरच एकमेकावर दगडफेक झाली. पोलिसांनी तात्काळ बीड येथून पोलिसाची कुमक मागवून परिस्थिती नियंत्रणात आणली.

नेकनूरमध्ये अलीकडे रस्त्यावर काही किरकोळ अपघात घडल्यास मोठ्या वादात पर्यावसान होण्याच्या घटना घडू लागल्या आहेत .असाच प्रकार शनिवारी संध्याकाळी सायंकाळी आठच्या दरम्यान बसस्थानकासमोर घडला . रिक्षाकडून दुचाकीला कट बसल्याचे कारणाने मोठे स्वरूप घेतले. या रिक्षात असलेल्या महिलेलाही मारहाण करण्यात येत असल्याचे दिसतात आजूबाजूच्या काहीनी यामध्ये पान 3 वर

# महिलेचा विनयभंग करून मारहाण, दोघांवर गुन्हा



केज : तालुक्यातील एका गावात 32 वर्षीय महिलेचा विनयभंग करून तिला दगडाने बेदम मारहाण केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात पीडित महिलेच्या तक्रारीवरुन डिगांबर ढाकणे आणि त्याच्या आईविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 25 एप्रिल रोजी पहाटे 5:00 वाजेच्या सुमारास पीडित महिला आपल्या घरासमोर उभी होती. यावेळी आरोपी डिगांबर विष्णू ढाकणे याने महिलेचा हात धरून विनयभंग केला. "तू माझ्यासोबत पान 3 वर

# प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांचा 'एकता रंगकर्मी प्रबोधनरत्न' पुरस्काराने गौरव

## पुरस्कार दिवंगत रंगकर्मी कल्याण वाघमारे यांना समर्पित




पुरस्कार' प्रदान करण्यात आला. 26 एप्रिल रोजी सेलू येथील साई नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या एका अतिशय दिमाखदार आणि चैतन्यमय सोहळ्यात हा सन्मान सोहळा पार पडला.

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी):

आपल्या कसदार लेखनातून आणि प्रगल्भ दिग्दर्शनातून सांस्कृतिक क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारे प्रख्यात सिने-नाट्य लेखक, दिग्दर्शक आणि संत रामदास महाविद्यालय घनसावंगी येथील नाट्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांना यंदाचा मानाचा 'एकता रंगकर्मी प्रबोधनरत्न

साहित्य, कला,सिने-नाट्य सांस्कृतिक ,आणि सामाजिक क्षेत्रातील डॉ. तायडे यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल पान 3 वर

# शिवसेना महिला आघाडीच्या कामकाजाचा ॲड. संगिता चव्हाण यांच्याकडून आढावा

बीड जिल्ह्यातील शिवसेना पक्षाची महिला आघाडीच्या परळी, अंबाजोगाई, केज तालुक्याची बैठक अंबाजोगाई येथे शासकीय विश्रामगृह येथे संपन्न झाली. या बैठकीला शिवसेना मराठवाडा संपर्क प्रमुख ॲड.संगिता चव्हाण यांनी संबोधित केले.

या बैठकीस संबोधित करताना महिला आघाडी बळकट करण्यासाठी 'गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक' यावर लक्ष केंद्रित करण्यावर जोर दिला. महिला आघाडीत पदभरणे, शाखा वाढवणे, महिला आघाडी ची बैठक लावणे यावर चर्चा करण्यात आली. या वेळी पदाधिकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना नेत्या तथा विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या आदेशावरून शिवसेना सचिव संजय मोर व शिवसेना नेत्या मीना कांबळी यांच्या सुचनेने आरोग्य मंत्री तथा शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख प्रकाश अबीटकर बीड जिल्हा संपर्क मंत्री भरत

गोगावले, शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन, लोकसभा संपर्क प्रमुख मनोज शिंदे, उपनेत्या संगिता ठोंबरे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील शिवसेना संघटनेला अधिक बळकट करण्यासाठी पान 3 वर

# शेतात वृक्षारोपण करून अनोख्या पद्धतीने साजरा केला पुरुषोत्तम वीर यांचा वाढदिवस







बीड प्रतिनिधी :

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी…" या संत तुकाराम महाराजांच्या ओळींचा विचार प्रत्यक्षात उतरवत रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष मा. पुरुषोत्तम (गोटू) वीर यांचा वाढदिवस यंदा अत्यंत वेगळ्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यात आला. बीड-गेवराई महामार्गावरील त्यांच्या शेतात वृक्षारोपण करून अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यासह शहरातून विविध पक्षांचे नेते, शासकीय अधिकारी-कर्मचारी, तसेच सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने डीजे, फटाके आणि दिखाऊ खर्च टाळत मित्रपरिवाराने साधेपणाला प्राधान्य देत वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून समाजाला सकारात्मक संदेश दिला. पान 3 वर

# दिव्य ज्योती जागृती संस्थानच्या वतीने गेवराई येथे भव्य श्रीमद भागवत कथेचे आयोजन









गेवराई (प्रतिनिधी) – शहरात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण करणाऱ्या भव्य श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कथेचे आयोजन दिव्य ज्योति जाग्रति संस्थान, शाखा पाथर्डी यांच्या अंतर्गत दिव्य ज्योति परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

ही कथा दिनांक 26 एप्रिल ते 2 मे 2026 या कालावधीत दररोज सायंकाळी 4.30 ते रात्री 8.30 या वेळेत पार पडणार आहे.


स्थळ – दसरा मैदान, बीड रोड, गेवराई, जि. बीड

या पवित्र कथेचे निरुपण कथा व्यास साध्वी वैष्णवी भारती जी यांच्या मधुर व प्रभावी वाणीने होणार असून, त्यांच्या मार्गदर्शनातून उपस्थित भाविकांना श्रीकृष्ण चरित्र, धर्म, भक्ती व अध्यात्म यांचे सखोल ज्ञान लाभणार आहे.

ही कथा संस्थेच्या "कामधेनु" प्रकल्पासाठी समर्पित असून, या माध्यमातून समाजसेवा व आध्यात्मिक जागृतीचा संदेश देण्यात येणार आहे.

तरी गेवराई शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पान 3 वर

# तांबवा येथे चार ठिकाणी घरफोडी, दागिन्यांसह 3 लाख 33 हजाराचा ऐवज लांबविला



केज : तालुक्यातील तांबवा येथे अज्ञात चोरट्यांनी चार ठिकाणी घरफोडी करीत रोख 2 लाख 36 हजार रु. आणि सोन्याच्या दागिन्यासह 3 लाख 34 हजाराचा ऐवज लांबविला आहे. 25 एप्रिल रोजी मध्यरात्री 1:00 ते 3:00 वाजेच्या दरम्यान तांबवा (ता. केज) येथे 25 एप्रिल रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी शंकर भगवानराव चाटे यांच्या घरात प्रवेश केला.

घरातील 90 हजार रुपये किंमतीचे दीड तोळ्याची बोरमाळ, एक तोळ्याचे गंठण, पाच ग्रॅमचे पान 3 वर

# कपडे खरेदी करण्यासाठी गेलेल्या दोन तरुणांवर काळाचा घाला



गेवराई : बीडकडून दुचाकीवरुन गावाकडे परतत असताना आज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने दोन तरुण जागीच ठार झाले. ही घटना शनिवारी दि.25 धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी उड्डाण पूलाजवळ घडली. अभिजीत सुभाष राठोड (वय : 23) व अभिजीत एकनाथ पवार ( वय : 23, रा. जातेगाव, गावखोर तांडा, ता.गेवराई जि. बीड) पान 3 वर

# रामपुरी येथे आंबेडकर जयंती उत्सवात जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांची उपस्थिती

## 28 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता कार्यक्रम; मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित




प्रतिनिधी – मौजे रामपुरी येथे सालाबादप्रमाणे यावर्षीही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. दिनांक 28 एप्रिल 2026, मंगळवार रोजी आयोजित या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन हे सकाळी 10 वाजता उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या जयंती उत्सवाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) चे प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे, किशोर कांडेकर, सचिन उजगरे आदी मान्यवरांचीही उपस्थिती अपेक्षित आहे.

मौजे रामपुरी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विकास शरणांगत, उपाध्यक्ष प्रविण शरणांगत तसेच समितीचे सर्व पदाधिकारी आणि मार्गदर्शक कचरु पान 3 वर

# एस.के.एस क्लासच्या 200 विद्यार्थ्यांची गगनभरारी

## मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव




बीड/प्रतिनिधी: येथील जालना रोड परिसरात गेल्या 15 वर्षांपासून अविरत कार्यरत असलेल्या एस.के. एस. क्लास व अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी यावर्षी विविध परिक्षांमध्ये मोठी गगनभरारी घेतली असून याचे औचित्य साधुन क्लासचे संचालक यांनी आपल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व्हावा यासाठी दि. 22 एप्रिल रोजी मोठ्या व्यासपीठाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अमोल गरकळ (विभागीय वनाधिकारी, बीड),भगवान सोनवणे (उपशिक्षणाधिकारी प्राथमिक बीड), शशिकांत सावंत (जेष्ठविधीतज्ञ जिल्हा व सत्र न्यायालय, बीड), नामदेव चांगण, उपप्राचार्य, दिलीप चौरे, कैलास चौरे, नितीन चौरे, डॉ. सुनील मस्तुद, व्यंकटेश वैष्णव (जिल्हा पान 3 वर

# माजलगाव : परशुराम हिंदू सेवा संघाच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा





माजलगाव (प्रतिनिधी):

शहरातील बायपास रोड जवळ असलेल्या प्रसिद्ध अशा श्री बालाजी मंदिर येथे परशुराम हिंदू सेवा संघाच्या वतीने अक्षय्य तृतीया व भगवान परशुराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भगवान परशुराम यांची महाआरती आणि पूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

*भक्तीमय वातावरणात पूजन*

रविवारी पार पडलेल्या या कार्यक्रमात भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थित भाविकांनी भगवान परशुराम यांच्या जयघोषाने पान 3 वर

# मातंग समाजातील शैक्षणिक अंधार दूर करण्याची ध्येयवेड्या तरुणाची धडपड.

## अमोल शेरकरच्या शिक्षण संवाद यात्रेला तालुक्यातून मोठा प्रतिसाद.



माजलगाव ( प्रतिनिधी ) : मातंग समाजातील शैक्षणिक मागासलेपणाला छेद देत,नव्या पिढीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवण्यासाठी एक तरुण झटताना दिसत आहे.हा तरुण म्हणजे अमोल शेरकर. शिव,फुले शाहू,आंबेडकर,अण्णाभाऊ,लहुजीयांच्या प्रेरणेतून ध्येय,जिद्द आणि सामाजिक बांधिलकी जोपासत सध्या त्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने 14 एप्रिल पासून संपूर्ण माजलगाव तालुक्यात शिक्षण संवाद यात्रा राबवत समाजजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य सुरु केले असूनही या यात्रेला तालुक्यातील समाज पान 3 वर



• परळी तालुक्यातील मौजे परचुंडी येथील श्रीराम भागुजीआप्पा पत्रवाळे यांची कन्या चि.सौ..का. कोमल व कै. सुरेशअप्पा बाबूआप्पा मेनकुदळे यांचे चि. आत्मलिंग यांच्या शुभविवाह प्रसंगी शुभेच्छा देताना सामाजिक कार्यकर्ते भीमाशंकरआप्पा नावंदे, आदर्श शिक्षक अशोक नावंदे, गणेश पत्रवाळे, पत्रकार बालाजी ढगे व संतोष जुजगर दिसत आहेत